# ४ गवतफुला रे! गवतफुला!

- ऐका. म्हणा. वाचा.



रंगरंगुल्या, सानसानुल्या, गवतफुला रे गवतफुला!
असा कसा रे मला लागला, सांग तुझा रे तुझा लळा!

मित्रासंगे माळावरती, पतंग उडवित फिरताना
तुला पाहिले गवतावरती, झुलता झुलता हसताना,
विसरून गेलो पतंग नभिचा, विसरून गेलो मित्राला
पाहुन तुजला हरखून गेलो, अशा तुझ्या रे रंगकळा!

हिरवी नाजुक रेशिम-पाती, दोन बाजूंला सळसळती
नीळनिळूली एक पाकळी, पराग पिवळे झगमगती,
तळी पुन्हा अन् गोजिरवाणी, लाल पाकळी खुलली रे
उन्हामधे हे रंग पाहता, भान हरपुनी गेले रे!

वारा घेउन रूप सानुले, खेळ खेळतो झोपाळा
रात्रहि इवली होउन म्हणते, अंगाईचे गीत तुला,
मलाहि वाटे लहान होऊन, तुझ्याहूनही लहान रे
तुझ्यासंगती सदा रहावे, विसरूनि शाळा, घर सारे!

तुझी गोजिरी शिकून भाषा, गोष्टी तुजला सांगाव्या
तुझे शिकावे खेळ आणखी, जादू तुजला शिकवाव्या,
आभाळाशी हट्ट करावा, खाऊ खावा तुझ्यासवे
तुझे घालुनी रंगित कपडे, फूलपाखरां फसवावे!

**इंदिरा संत**–(१९१४–२०००) स्त्रीमनाचा हळुवारपणा व्यक्त करणाऱ्या कवयित्री. 'शेला', 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या', 'गर्भरेशीम' इत्यादी कवितासंग्रह तसेच 'अंगतपंगत', 'गवतफुला', 'मामाचा वाडा' हे बालकवितासंग्रह प्रसिद्ध. 'श्यामली', 'कदली' आणि 'चैतू' हे कथासंग्रह प्रसिद्ध.

या कवितेत कवयित्रीने माळावर फुललेल्या गवतफुलाचे वर्णन केले आहे.

**शिक्षकांसाठी :** पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरांत व साभिनय म्हणून दाखवाव्या. कवितांना योग्य चाली लावाव्या. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात म्हणून घ्याव्या.

## स्वाध्याय



**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील मुलाची गवतफुलाशी कुठे व कशी भेट झाली?

(आ) गवतफुलाला पाहून मुलगा कोणकोणत्या गोष्टी विसरला?

(इ) कवयित्रीने गवतफुलाच्या पानांचे व पाकळ्यांचे वर्णन कसे केले आहे?

(ई) गवतफुलाला लहान होऊन कोण कोण भेटायला आले आहे?

(उ) गवतफुलासोबत राहून मुलाला कोणकोणत्या गोष्टी करायच्या आहेत?

**प्र. २. तुम्हांला फुलपाखरू भेटले, तर तुम्ही त्याच्याशी काय संवाद साधाल? तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ३. खाली दिलेल्या अर्थाच्या कवितेतील ओळी शोधा.**

(अ) तुझे रंग पाहून मी स्वतःला विसरून गेलो.

(आ) मला तुझ्यापेक्षाही लहान व्हावेसे वाटते.

(इ) तुझी गोजिरी भाषा शिकून तुला गोष्टी सांगाव्या.

(ई) तुझ्यासारखे रंगरूप घेऊन फुलपाखरांना फसवावे.

**प्र. ४. या कवितेत गवतफुलाचे वर्णन करताना कोणाला, कोणते रंग वापरले आहेत ते लिहा.**


उदा., रेशिम–पाती – हिरवी (१) पाकळी – (२) पराग – (३) तळीची पाकळी –

**प्र. ५. गवतफुले व इतर फुले यांचे निरीक्षण करा. त्यांमधील साम्य व भेद लिहा.**

**प्र. ६. 'सळसळ' यासारखे आणखी शब्द लिहा.**


### खेळूया शब्दांशी.

**(अ) समान अर्थाचे शब्द लिहा.**




**(आ) रंगरंगुल्या, सानसानुल्या, नीळनिळूली यांसारखे शब्द शोधा व लिहा.**

**(इ) गवतफुलाचे वर्णन करणारे शब्द शोधून आकृतीत लिहा.**



**उपक्रम :** (१) एखाद्या माळरानावर फिरताना तुम्ही गवतफुले पाहिली आहेत का? ती कोणकोणत्या रंगांची असतात? तुम्ही पाहिलेल्या गवतफुलाचे चित्र काढा व रंगवा.

(२) मंगेश पाडगांवकर यांची 'मी फूल तृणातिल इवले' ही कविता मिळवा व लिहा. कवितेला चाल लावून वर्गात सादर करा.

**प्रकल्प :** वृत्तपत्रांमधून विविध फुलांविषयी येणाऱ्या माहितीची कात्रणे मिळवा. या कात्रणांपासून चिकटवही बनवा.

## कविता करूया.

- **केंद्रीय उच्च प्राथमिक मराठी शाळा कापरा (मे.), ता. जि. यवतमाळ या शाळेतील सोनाली श्रावण फुपरे, हिने इयत्ता सहावीत असताना 'झाड' या विषयावर तयार केलेली कविता वाचूया.**

### झाड

झाड आहे हिरवेगार,
वारा देते थंडगार.

झाडाच्या सावलीत मी बसते,
झाड खुदकन गालात हसते.

झाड देते माया,
झाड देते छाया.

झाडावर भरते पक्ष्यांची शाळा,
झाडाखाली सर्व प्राणी होतात गोळा.

झाडाला लागतात सुंदर फुले,
फुले तोडायला येतात मुले.

झाड आहे माझा मित्र,
माझ्या मनात राहते नेहमी झाडाचे चित्र.



- **सोनालीप्रमाणे आपणही खाली दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करूया.**

१. माझी शाळा म्हणते खेळ खेळा
वेळ, काळ तुम्ही नियमित पाळा,
................................
................................

२. जाऊ जंगल सफरीला
पाहू आनंदे निसर्गाला,
................................
................................